# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)


**दिनांक १६.०७.२०२६ गुरूवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे सोनेगांव :— विश्वासघात करून चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी मुरलीधर रेड्डीनायक घुगलावत, वय ४० वर्षे, रा. मामड मंडल, तह. निर्मल, राज्य तेलंगना हे फोटाग्राफी चा व्यवसाय करतात. फिर्यादीचा मित्र नामे मोहन सागर यांचे मार्फतीने फिर्यादी व आरोपी नामे कार्तीक चौधरी अक्कीनेनी, वय ४६ वर्षे, रा. सत्यनारायणा मुर्ती टेम्पल स्ट्रीट, चेलपुर मंडल, तह. वेलपुर, जि. पोस्ट गोदावरी, राज्य आंध्रप्रदेश याचेसोबत ओळख झाली. आरोपीने फिर्यादी यांना प्री—वेडींग फोटाशुट करायचे आहे असे सांगुन फोटाशुट करीता नागपुर येथे सोबत आणले. पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीत हॉटेल एक्स, सोमलवाडा येथे दोघेही एकाच रूममध्ये थांबले होते. दिनांक १५.०७.२०२६ चे ०३.०० वा. चे सुमारास, फिर्यादी हे हॉटेलचे रूममध्ये झोपले असतांना, आरोपीने फिर्यादीचे बॅगमधुन ॲप्पल १७ प्रो मॅक्स मोबाईल, ओपो एफ २१ मोबाईल, सोनी आर ०४ कॅमेरा, कॅनॉन आर ०६ लेन्स, सोनी कॅनॉन कंपनीचे लेन्स ०८ नग असा एकुण किंमती अंदाजे ६,६०,०००/—रू. चा मुद्देमाल फिर्यादीस न सांगता, त्यांचा विश्वासघात करून चोरून नेला.

अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सोनेगांव येथे पोउपनि. शेषराव येवलेकर ९९७०६५४६४४ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे एमआयडीसी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १३.०७.२०२६ चे ११.४५ वा. ते दिनांक १५.०७.२०२६ चे ०९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत संगम रोड, वानाडोंगरी, तुळजा भवानी नगर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी चंद्रशेखर कांतीलाल राहांगडाले, वय ३९ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह नातेवाईकाचे अंत्यविधीकरीता गोंदीया येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील गुल्लकमधील रोख २२,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,२०,२५०/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. प्रशांत राऊत ७८८७८२१२२७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे सोनेगांव :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १६.०७.२०२६ चे ०८.४० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे नागोरावजी भानोदासजी महाजन, वय ७४ वर्ष, रा. घर नं. १९२५/सि, एमएसईबी ऑफीस जवळ, सोमलवाडा, सोनेगांव, नागपूर हे त्यांचे टि.व्ही.एस स्कुटी मोपेड क्र. एम. एच. ३१ बि.टी. ४०३१ ने नेहमीप्रमाणे सेक्युरिटी जॉबवर स्वामीपुरम अपार्टमेंट, चिचभवन येथे जात असतांना, पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीत चिचभवन पुलावर कोणीतरी अज्ञात वाहनचालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे वडीलांचे मोपेडला जोरात धडक देवुन, गंभीर जखमी करून पळुन गेला. गंभीर जखमी फिर्यादीचे वडीलांना उपचाराकरीता एम्स हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी प्रविण नागोरावजी महाजन, वय ३७ वर्षे रा. घर नं. १९२५/सि, एमएसईबी ऑफीस जवळ, सोमलवाडा, सोनेगांव, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सोनेगांव येथे पोउपनि संजय आठवले ९९२३६१८०३५ यांनी अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम २८१,१०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. अज्ञात वाहन चालक आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## <u>वाहतुक शाखेची प्रेसनोट</u>

मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्र. अपोमसं(वा) /४५/नियो/३१०५/२०१९ दिनांक २०१०.२०१९ अन्वये पारीत केलेल्या अधिसुचेनेनुसार रस्ते अपघात आणि त्यामध्ये होणाऱ्या मृत्युमध्ये दरवर्षी १० टक्के घट करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्याअर्थी नागपूर शहरातील अपघातांची कारणे पाहता सदरचे अपघात हे निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहने चालविल्यामूळे होत असून, त्यामध्ये निष्पाप लोकांचे नाहक बळी जात आहेत व अनेक लोक गंभीर जखमी होवून त्यांना कायमचे अपंगत्व येत आहे. त्यामुळे होणारे अपघातांवर आळा घालने अत्यंत आवश्यक असून त्याकरीता शहरातील सुधारीत सिमेंन्ट रस्ते तसेच ईन्नर व आऊटर रिंग रोडवरून चालणाऱ्या वाहनांसाठी वेग मर्यादा निश्चित करणे गरजेचे आहे. करीता खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे.

• यापुर्वी निर्गमीत झालेली अधिसुचना क्र. पोउपआ/वावि/अधि.वेगमर्यादा/१००४/२०१७ दि. ०९.०३.२०१७ प्रमाणे ठरविण्यात आलेली खालील वाहनांबाबतची वेग मर्यादा रद्द करण्यात येत असून शहरातील सध्याची लोकसंख्या, वाहन संख्या तसेच रस्ते व वाहतूकीची सद्यस्थिती पाहता वाहनांवर खालील प्रमाणे वेग मर्यादेचे बंधन घालण्यात येत आहे.

| महाराष्ट्र राज्यातील वाहनांसाठी अनिर्वाय करण्यात आलेली वेग मर्यादा कि. मी./प्रतितास | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | वाहनांचा प्रकार | प्रवेश नियंत्रण असलेले द्रुतगती मार्ग | | राष्ट्रीय/राज्य महामार्गावर 4 (2+2) अथवा जास्त मार्गिका असणारे विभाजीत (रस्त्याच्या मध्यभागी विभाजक असलेले मार्ग) | | महानगरपालीका कार्यक्षेत्रामध्ये मधील द्रुतगती मार्ग आणि 6 (3+3) मार्गिका असणारे विभाजीत रस्ते | | राष्ट्रीय/राज्य महामार्गावर 2 अथवा जास्त मर्गिकेचे विभाजक नसलेले रस्ते व महानगर पालीका कार्यक्षेत्रामधील 4 (2+2) मार्गिका असणारे विभाजीत रस्ते | | नगरपालीका क्षेत्रातील रस्ते/इतर रस्ते | |
| | | समतल भाग | घाट भाग | समतल भाग | घाट भाग | समतल भाग | घाट भाग (लागू असल्यास) | समतल भाग | घाट भाग | समतल भाग | घाट भाग |
| (1) | (2) | (3) | | (4) | | (5) | | (6) | | (7) | |
| | प्रवासी मोटार वाहने ज्यांचा उपयोग वाहन चालकांसह 8 प्रवासी यांचे वाहतूकीसाठी केला जातो. (एम. 1 श्रेणीतील वाहने) | 100 | 60 | 90 | 50 | 80 | 40 | 70 | 40 | 60 | 40 |
| | प्रवासी मोटार वाहने ज्यांचा उपयोग वाहन चालकांसह 9 किंवा त्यापेक्षा जास्त प्रवासी यांचे वाहतुकीसबंधी केला जातो. ( एम 2 आणि एम 3 श्रेणीतील वाहने) | 80 | 40 | 80 | 40 | 60 | 40 | 60 | 40 | 50 | 30 |
| | मोटार वाहने ज्यांचा उपयोग माल/सामान वाहतूकीसाठी केला जातो. (सर्व एन श्रेणीतील वाहने) | 80 | 40 | 80 | 40 | 60 | 40 | 60 | 40 | 40 | 30 |
| | दुचाकी मोटर वाहने | परवानगी नाही | परवानगी नाही | 70 | 40 | 60 | 40 | 60 | 40 | 50 | 40 |
| | चारचाकी मोटर रिक्षा | परवानगी नाही | परवानगी नाही | 60 | 40 | 60 | 40 | 60 | 40 | 40 | 30 |
| | तीनचाकी मोटर वाहने/रिक्षा | परवानगी नाही | परवानगी नाही | 60 | 40 | 50 | 40 | 50 | 40 | 40 | 30 |

**सदर अधिसुचना दि. १७.०७.२०२६ पासून ते दिनांक १६.०८.२०२६ पर्यंत अंमलात राहील.**

सदरहु अधिसूचना एक महिन्याच्या कालावधीसाठी पारित करण्यात येत असून त्याबाबत नमूद कालावधीत नागरीकांकडून जर काही हरकती व सुचना प्राप्त झाल्या तर त्याचा विचार करून पून्हा अधिसूचना काढताना केला जाईल.

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/—

( **आदित्य मिरखेलकर, भापोसे.** )

पोलीस उप आयुक्त,वाहतुक,

नागपूर शहर.